आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१

दुरध्वनी- ०२० -२६३६०९४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जावक क्र. आसंप्रसं/२०२२/स्पर्धा परीक्षा/ प्र.क्र. /का- ४/ ४५०७

दिनांक : २९.१२.२०२२

## मुदतवाढ

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ/महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवा व राज्य प्रशासकीय सेवा स्पर्धा पूर्व परीक्षांच्या संपूर्ण तयारीकरिता ०९ विद्यापीठांमधून प्रशिक्षण देणे योजनेच्या लाभाकरिता ऑनलाईन स्वरुपात अर्ज करणेसाठी मुदतवाढ

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ/महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवा व राज्य प्रशासकीय सेवा स्पर्धा पूर्व परीक्षांच्या संपूर्ण तयारीकरिता ०९ विद्यापीठांमधून प्रशिक्षण देणे योजनेच्या लाभाकरिता ऑनलाईन स्वरुपात अर्ज करणेसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांसाठी दिनांक ०२/०१/२०२३ (म.रा. १२.००) पर्यंत अर्ज सादर करण्यासाठी https://trti.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर प्रशिक्षण योजनेच्या लाभासाठी अर्ज करते वेळेस इच्छुक व पात्र उमेदवारांनी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून प्राप्त वैधता प्रमाणपत्र किंवा वैधता प्रमाणपत्र नसल्यास संबधित समितीकडे वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठीचे अर्ज दाखल केलेली पावती अपलोड करावी.

सदर योजनेसाठी https://trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरूनच ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड ही सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) द्वारे गुणांकन पद्धतीने करण्यात येणार आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदर योजनेचा अधिकाधिक उमेदवारांनी लाभ घेण्यासाठी देण्यात आलेल्या दिनांक ०२/०१/२०२३ (म.रा. १२.००) रोजीच्या अंतिम तारखेत बदल करून दिनांक ०७/०१/२०२३ (म. रा. १२.००) पर्यंतची मुदतवाढ देण्यात येत आहे.

**अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : दिनांक ०७/०१/२०२३ (म. रा. १२.०० पर्यंत) शनिवार**

(हंसध्वज सोनवणे)
आयुक्त